# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
## ज्ञान स्रोत केंद्र ( ग्रंथालय )
## ( नॅक समिती द्वारे 'अ +' दर्जा प्राप्त )

प्रा. डॉ. सुभाष चव्हाण
एम. ए., एम.लिब.एस्सी., पीएच.डी.
संचालक
दूरध्वनी ( कार्या ) (०२४०) २४०३११९० ते
दूरध्वनी } २४०३३१९५
भ्रमणध्वनी : ९४२२७११७९०
तार : बामूसीटी
वेबसाईट : www.bamu.ac.in
ई-मेल : director.krc@bamu.ac.in

विद्यापीठ प्रांगण
छत्रपती संभाजीनगर
(महाराष्ट्र) ४३१००४

संदर्भ क्र.: डॉ.बामुकेआरसी /२०२६/ 585

दिनांक - १३/१०/२०२६

प्रति,
सर्व विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग व अभ्यास केंद्रे,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

विषय: डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती व 'वाचन प्रेरणा दिना'निमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६ च्या आयोजनाबाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी व अभ्यासकांना कळविण्यात येते की, भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९५व्या जयंतीनिमित्त व 'वाचन प्रेरणा दिना'चे औचित्य साधून ज्ञान स्रोत केंद्रातर्फे विशेष 'प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे:

- दिनांक : गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६
- वेळ : दुपारी १२:३० वाजता
- स्थळ : विद्यापीठ इंटरनेट प्रयोगशाळा (Internet Lab), ज्ञान स्रोत केंद्र

*महत्त्वाच्या सूचना:*

१. या स्पर्धेत विद्यापीठातील सर्व विभागांच्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे.

२. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र (Participation Certificate) प्रदान करण्यात येईल.

३. गुणवत्तेनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रथम तीन विजेत्यांना विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल.

तरी सर्व विभागप्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या विभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

संचालक